माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**
**अपील क्रमांक : १०७२/२०२०**

**अपिलार्थी, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,**
**रा. रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ.**
**विरुध्द**

**उत्तरार्थी १. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
बांधकाम विभाग, नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.

सुनावणी दिनांक १३.०८.२०२६ (In Continuation of order dated ३०.०४.२०२६)

द्वितीय अपील सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. हरिश जाधव उपस्थित आहेत.

**विवेचन**

आयोगाने कलम १९ (१०) नूसार पारित केलेले आदेश कलम १९ (७) नूसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणास अनुपालनासाठी बंधनकारक आहे. मात्र आयोगाने दि. ०५.०३.२०२६ रोजी पारित आदेशाचे अद्यापही अनुपालन अहवाल मुख्याधिकारी तसेच त्यांचे प्रतिनिधी श्री. हरिश जाधव यांनी सादर केलेले नाही. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून आयोग याबाबत तिव्र नाराजी व्यक्त करित आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

**अंतरिम आदेश**

१. मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ यांना आदेशीत करण्यात येते की,त्यांनी आयोगाचे दि.०५.०३.२०२६ रोजीच्या पारित आदेशातील अनु. क्र. १, २ व ३ नूसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करावा.
२. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री.शुभम क्यातमवार यांनी दि.०५.०३.२०२६ रोजीच्या पारित आदेशाचे अनुपालन केले नाही. परिणामी, कलम १९ (७) चा भंग झाला म्हणुन त्यांचेविरुध महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/६ (मा.अ.) दि. १०.०६.२००८ अन्वये शिस्तभंगाची शिफारस का करण्यात येवू नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीचे वेळी आयोगासमक्ष व्यक्तीशः उपस्थित राहुन सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २१.०८.२०२६ रोजी घेण्यात येईल.

(Signature)

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १३.०८.२०२६**
जावक क्रमांक ६३०४ दिनांक 19 AUG 2026

Vishal D.Ingale -2025/